क्र. १५७ पहिले वर्ष

१३ ऑगस्ट २०२३

# रविवारची उपासना

## सामान्यकाळातील एकोणिसावा रविवार

### प्रस्तावना

परमेश्वर चराचर सृष्टीचा निर्माता आहे. ज्या अद्‌भूत शक्तीच्या सामर्थ्यापुढे माणूस नतमस्तक होतो, अशा अद्भुत शक्ती परमेश्वर नियंत्रित करतो. ज्यावेळेस वादळ-पावसासारखी नैसर्गिक आपत्ती येते तेव्हा आपण हतबल होतो. काय करावं सूचत नाही, कोणालाच मार्ग नसतो! अशावेळी आपला नाईलाज होतो, आणि आपण परमेश्वराच्या अधीन होतो. कधीकधी आपल्या दैनंदिन जीवनात वादळाचे प्रसंग येतात. जीवन उद्‌ध्वस्त होण्याची वेळ येते. अशावेळीसुध्दा आपल्याला परमेश्वराच्या साहाय्याची गरज असते. परमेश्वर आपला मुक्तिदाता, तो आपल्याला मार्गदर्शन करीत असतो. समुद्रातील वादळाने शिष्य भयभीत झाले तेव्हा ख्रिस्ताने त्यांना सांगितले की, तुमचा विश्वास दृढ करा! आपण आपल्या जीवनात अडीअडचणीच्या प्रसंगाला सामोरे जाण्यास परमेश्वराचे सामर्थ्य आपल्याला मिळावे व आपला विश्वास बळकट व्हावा म्हणून आपण ह्या मिस्साबलीत प्रार्थना करूया.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करूया**

हे सर्वसमर्थ व नित्यजिवी परमेश्वरा, तुझ्या पवित्र आत्म्याने तुझी मुले बनवले. तुला बाप ह्या नावाने हाक मारण्यास आम्हांला धैर्य दिले. तुझ्या पवित्र आत्म्यास आम्हामध्ये कायम ठेव व तू अभिवचन दिलेल्या स्वर्गराज्याचे आम्हांला वरदान दे. ही प्रार्थना आम्ही तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

प्रभूशब्द विधी

### पहिले वाचन

**एक राजे या पुस्तकातून घेतलेले वाचन**

**१९:९, ११-१३**

**"तू येथून बाहेर निघून जा आणि पर्वतावर परमेश्वरासमोर उभा राहा."**

एलिया गुहेत राहिला. तेव्हा पाहा, परमेश्वराचे वचन त्यास प्राप्त झाले. त्याने त्यास म्हटले, तू येथून बाहेर निघून जा आणि पर्वतावर परमेश्वरासमोर उभा राहा. तेव्हा पाहा, परमेश्वर जवळून जात असता त्याच्यासमोरुन मोठा सोसाट्याचा वारा सुटून डोंगर विदारीत व खडक फोडीत होता, वाऱ्यात परमेश्वर नव्हता. वारा सुटल्यानंतर भूमिकंप झाला; पण त्या भूमिकंपातही परमेश्वर नव्हता. भूमिकंपानंतर अग्नी प्रकट झाला, पण त्या अग्नीतही परमेश्वर नव्हता. त्या अग्नीनंतर शांत, मंद वाणी झाली. एलियाने ती ऐकताच आपल्या झग्याने तोंड झाकून घेतले व बाहेर जाऊन गुहेच्या तोंडाशी तो उभा राहिला.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### प्रतिसाद स्तोत्र

प्रतिसाद : **हे परमेश्वरा, तुझी दया दाखव आणि तुझी तारणदायी मदत आम्हांला दे.**

१. परमेश्वर देव बोलेल ते मी ऐकून घेईन, कारण तो आपल्या लोकांशी आणि आपल्या भक्तांशी क्षेमकुशलांचे भाषण करील. त्याचे भय धरणाऱ्यांना त्याने सिध्द केलेले तारण खरोखर समीप असते. यासाठी की आमच्या देशात वैभव नांदावे.

२. दया आणि सत्य ही एकत्र झाली आहेत. न्यायत्व आणि शांती यांनी एकमेकांचे चुंबन घेतले आहे. पृथ्वीतून सत्य बाहेर पडत आहे, स्वर्गातून न्याय्यत्व अवलोकन करत आहे.

३. जे उत्तम ते परमेश्वर देईन आणि आमची भूमी आपले फळ देईल. त्याच्यापुढे नीतिमत्ता चालेल आणि त्याची पावले इतरांना मार्गदर्शक होतील.

### दुसरे वाचन

**पौलाचे रोमकरांस पत्र यातून घेतलेले वाचन ९:१-५**

**"माझ्या नातेवाईकासाठी मी ख्रिस्तापासून विभक्त व्हावे हे शक्य असते तर तशी मी इच्छा केली असती."**

मी ख्रिस्तामध्ये खरे बोलतो, खोटे बोलत नाही, माझी सद्सद्विवेकबुध्दीही पवित्र आत्म्यामध्ये माझ्याबरोबर साक्ष देते की, मला मोठा खेद वाटतो आणि माझ्या अंत:करणामध्ये अखंड वेदना होत आहेत. कारण माझे बंधुजन म्हणजे देहदृष्ट्या माझे नातेवाईक ह्यांच्यासाठी मी स्वत: ख्रिस्तापासून शापभ्रष्ट व्हावे हे शक्य असते तर मी तशी इच्छा केली असती. ते इस्राएली आहेत; दत्तकपणा, ईश्वरी तेज, करारमदार, नियमशास्त्र, उपासना आणि अभिवचने ही त्यांची आहेत. महान पूर्वजही त्यांचे आहेत आणि त्यांच्यापासून देहदृष्ट्या ख्रिस्त आहे. तो सर्वांच्यावर असून युगानुयुग धन्यवादित देव आहे. आमेन.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### जयघोष

**इफिस. १:१७-१८**

**आलेलुया, आलेलुया !**

आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याचा पिता हा आमचे अंत:चक्षू प्रकाशित करो.

म्हणजे त्याच्या पाचारणामुळे निर्माण होणारी आशा कोणती ही आम्ही ओळखावी

**आलेलुया!**

### शुभवर्तमान

**मत्तयलिखित शुभवर्तमानातून घेतलेले वाचन**

**२४:२२-३३**

**"प्रभो, पाण्यावरून आपणाकडे येण्यास मला सांगा."**

मी लोकसमुदायांस निरोप देत आहे तो तुम्ही तारवात बसून माझ्याआधी पलीकडे जा, असे म्हणून येशूने लागलेच शिष्यांस पाठवून दिले. मग लोकसमुदायांना निरोप दिल्यावर तो प्रार्थना करावयास डोंगरावर एकांती गेला आणि रात्र झाल्यावरही तो तेथे एकटा होता. इकडे वारा तोंडचा असल्यामुळे किनाऱ्यापासून बऱ्याच अंतरावर तारु लाटांनी हैराण झालेले होते. तेव्हा रात्रीच्या चवथ्या प्रहरी तो समुद्रावरून चालत त्यांच्याकडे आला. शिष्य त्याला समुद्रावरून चालताना पाहून घाबरून

गेले आणि म्हणाले, ''भूत आहे'' आणि ते भिऊन ओरडले. परंतु येशू त्यांना लगेच म्हणाला, ''धीर धरा, मी आहे, भिऊ नका.''

तेव्हा पेत्रने उत्तर दिले, ''प्रभो, आपण असाल तर पाण्यावरून आपणाकडे येण्यास मला सांगा.'' त्याने म्हटले, ''ये'' तेव्हा पेत्र येशूकडे जाण्यासाठी तारवातून उतरुन पाण्यावरून चालू लागला, परंतु वारा पाहून तो भ्याला आणि बुडू लागला असता तो ओरडून म्हणाला, ''प्रभूजी, मला वाचवा. येशूने तत्क्षणी हात पुढे करून त्याला धरले आणि म्हटले, अरे अल्पविश्वासी, तू संशय का धरलास? मग ते तारवात चढल्यावर वारा पडला. तेव्हा जे तारवात होते ते त्याच्या पाया पडून म्हणाले, ''आपण खरोखर देवाचे पुत्र आहा.''

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**प्रास्ताविक**

माझ्या बंधुभगिनींनो, आमच्या तारणाचे रहस्य साजरे करण्यासाठी ख्रिस्ताठायी आम्ही येथे एकत्र जमलो आहोत. जीवन आणि आशीर्वादाचा हा झरा अखिल जगाला खुला करण्यासाठी आपण आपल्या परमेश्वरपित्याकडे याचना करू या.

आपला प्रतिसाद असेल – **हे प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. शब्दाची घोषणा आणि संस्कारामार्फत आपल्या श्रध्देचे पोषण होते. परमगुरू, महागुरू आणि धर्मगुरू याच्या शब्दघोषणेत व ख्रिस्तप्रसादविधीच्या अर्पणामुळे श्रध्दावंतांची श्रध्दा अधिक दृढ व्हावी, म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

२. इस्राएली लोक परदेशात गुलाम होते. आज गुलाम पध्दत नसली तरी बालकामगार, स्त्रीभ्रूण हत्या, नारी अत्याचार समाजात कायम आहेत. ही परिस्थिती पूर्णपणे बदलावी, म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

३. दुष्काळ आणि कुपोषण यांनी अनेक ठिकाणचे अनेक लोक त्रस्त झाले आहेत. कुणीही बालक किंवा स्त्रीपुरुष अन्नाशिवाय झोपी जाऊ नयेत, म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

४. ज्या देशाकडे अन्नधान्याची रेलचेल आहे. त्यांनी त्यांच्याकडील साधन संपत्ती गरजू, गरीब देशांना हस्तांतरीत करावी, म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

५. आपण आपले अन्न फुकट घालवू नये. तसेच पाण्याची व विजेची बचत करावी आणि गरीबांना त्याचा अधिक लाभ मिळावा, म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

६. वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

## समारोप

हे सर्वसमर्थ पित्या, तुझ्या लोकांच्या प्रार्थना ऐक. तुझ्या प्रेरणेमुळे श्रध्देने आम्ही तुझ्याकडे प्रार्थना करतो त्यांचा तू स्वीकार कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

सर्वसमर्थ परमेश्वरा, आम्ही आणलेली ही दाने तुझीच आहेत. तुझ्या ख्रिस्तसभेचे हे समर्पण स्वीकार आणि ह्या समर्पणात आमच्या तारणाचा संस्कार बनव. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे प्रभो, ह्या ख्रिस्तप्रसादाद्वारे आमचे तारण कर आणि तुझ्या ख्रिस्तसभेच्या श्रध्देशी आम्हाला एकनिष्ठ ठेव. ही प्रार्थना आम्ही प्रभू येशूच्या नावाने करतो.

## चिंतन

आजच्या उपासनेतील तिन्ही वाचने परमेश्वराच्या अद्‌भुत सामर्थ्याचे वर्णन करणारी आहेत.

**अ) परमेश्वराचे सामर्थ्य केवळ आगळ्यावेगळ्या गोष्टींमधून नव्हे तर साध्यासुध्या गोष्टींमधून प्रकट होते :** आजच्या पहिल्या वाचनात (१ राजे १९:९,११-१३अ) एलिया संदेष्ट्याला परमेश्वराचा दृष्टान्त होतो. परंपरेनुसार भूकंप, वादळवारे आणि अग्नीवर्षाव हे परमेश्वराच्या दिव्य उपस्थितीचे अग्रदूत मानले जायचे. एलियाने होरेब पर्वताच्या गुहेजवळ ह्या तिन्ही गोष्टींचा थरार अनुभवला. मात्र 'परमेश्वर त्याच्यात नव्हता' असे लेखक ठामपणे आपल्याला सांगत राहतो. नंतर जी एक 'शांत, मंद वाणी' ऐकू आली तिच्यातून परमेश्वर आपल्याशी बोलत असल्याचे एलियाने ओळखले. कधी कधी भव्य दिव्य गोष्टींच्या झगमगाटाचा ध्यास घेतल्याने साध्या सुध्या गोटींतील परमेश्वराचे अद्‌भुत सामर्थ्य माणसाला जाणवेनासे होते.

**ब) परमेश्वराचे सामर्थ्य आपण गृहीत धरू नये :** आजच्या दुसऱ्या वाचनात संत पौल रोमकरांस (रोम ९:१-५) जाणीव करून देतो की, इस्राएली लोकांना परमेश्वराचे विशेष आशीर्वाद लाभलेले होते. मात्र ती जनता परमेश्वराशी एकनिष्ठ राहिली नाही. त्यामुळे त्यांनी परमेश्वराचे सामर्थ्य गृहीत धरले. यहुद्यांनी सुवार्ता स्वीकारली नाही तेव्हा संत पौल आणि त्याचे सहकारी परराष्ट्रीयांकडे वळले होते. ह्या पार्श्वभूमीवर संत पॉलने दिलेला हा सावधानतेचा इशारा अतिशय गांभीर्याने घ्यायला हवा.

**क) परमेश्वराच्या सामर्थ्याचे भान ठेवण्यासाठी अंत:करणात श्रध्दा असायला हवी :** आजच्या शुभवर्तमानामध्ये (मत्तय १४:२२-३३) येशू पाण्यावरून चालत असल्याचा चमत्कार सादर करण्यात आलेला आहे. त्यावरून तीन गोष्टी सिध्द होतात. येशूचे निसर्गावरील नियंत्रण, मानवाची दुर्बळता (संत पीटर) आणि परमेश्वरावर नितांत श्रध्दा ठेवण्याची गरज. ''भिऊ नका, धीर धरा, मी आहे'' हे प्रभूचे आश्वासक शब्द आपल्याकडून श्रध्देची अपेक्षा करतात. अशीच श्रध्दा परमेश्वराच्या सामर्थ्याविषयी संवेदनक्षम असते, आणि ती यथाकाळी विपुल फळ धारण करते.

**आत्मपरीक्षण :** माझ्या जीवनात परमेश्वराचे सामर्थ्य मी कोणकोणत्या बाबतीत अनुभवतो? त्यामध्ये कोणते अडथळे जाणवतात?

●●●

| ऑगस्ट २०२३ | दैनंदिन बायबल वाचने | तिसरा सप्ताह |
|---|---|---|
| सोम १४ | सं मॅक्सिमिलियन कोल्बे (तां) | : अनुवाद १०:१२-२२/ मत्तय १७:२२-२७ |
| मंगळ १५ | मरियेचे स्वर्गनयन (पां) | |
| बुध १६ | हंगेरीचा सं स्तेफन (हि) | : अनुवाद ३४:१-१२/मत्तय १८:१५-२० |
| गुरु १७ | सं जोन ऑफ द क्रॉस (हि) | : यहोशवा ३:७-१७/मत्तय १८:२१-१९:१ |
| शुक्र १८ | सं हेलेना (हि) | : यहोशवा २४:१-१३/मत्तय १९:३-१२ |
| शनि १९ | सं जॉन यूड्स (हि) | : यहोशवा २४:१४-२९/मत्तय १९:१३-१५ |